**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १५३वी बैठक श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत आज संपन्न झाली. बैठकीमध्ये प्रास्तविक आणि विषयांचे सादरीकरण प्राधिकरणाचे मा. महानगर आयुक्त, श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास, भा.प्र.से. यांनी केले.**

**मुंबई महानगर प्रदेशातील नागरीकांसाठी पायाभूत सुविधा उदा. मेट्रो, रस्ते, दळणवळण, वाहतूक सुधारणा इ. सुधारण्याच्या दृष्टीने तसेच नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.**

**मुंबई, २० ऑक्टोबर, २०२२** :- प्राधिकरणाच्या १५३व्या बैठकीत खालील महत्वाच्या निर्णयांना मंजुरी देण्यात आली.

- प्राधिकरणाचे मेट्रो प्रकल्प (चालू व प्रस्तावित) पूर्ण करण्यासाठी मे. आर. ई. सी. लिमिटेड यांचेसोबत रु. ३०,४८३ कोटी निधी (कर्ज) उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- पूर्वद्रुतगती महामार्गावर ठाणे शहरातील **तीन हात नाका** येथे **वाहतूक सुधारणा प्रकल्पास** तसेच, त्याकरीता अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्च रु.२८९.१२ कोटीच्या प्रस्तावास तसेच भिवंडी – वाडा राज्यमार्ग क्र.३५ वरील विश्वभारती नाका, भिनार ते वडपे या रस्त्याच्या बांधकामासाठी रु. १४३ कोटीच्या रकमेस प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.
- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि सहाभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकाऱ्यांचा वापर करून ई – निविदा पध्दतीने मे. गोइसू रियल्टी प्रा.लि.(मे. सुमिटोमो रियल्टी अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. आणि मे. सुमिटोमो फुडोसान तातेमोनो सर्व्हिस कॉर्पोरेशन लि.) यांची **भूखंड क्र. सी-६९-सी साठी आणि भूखंड क्र. सी-६९-डी या वाणिज्य वापराच्या भूखंडाचे भाडेपट्टयाने वाटप** करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.
- मुंबई महानगर प्रदेशाच्या विकास केंद्राच्या विकासासाठी मागविलेल्या स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्तावास अनुसरून मे. ऑरेंज स्मार्ट सिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांना तत्वत: मान्यता देण्यास तसेच त्यांच्या सोबत संयुक्त उपक्रम बनविण्यास आणि **विशेष प्रयोजन वाहन (SPV)** स्थापन करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.
- मुंबई, ठाणे व नवी मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासोबतच या शहरांचा विकास करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या प्रस्तावित प्रकल्पांच्या कामाकरीता रु. १७,२१४.७२ कोटी इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पांचा सुसाध्यता अहवाल (Feasibility Report) व सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली आहे. (**यादी जोडली आहे**.)
- ठाणे शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी **रायलादेवी तलाव** सुशोभिकरणाच्या कामास रु. ३९.३१ कोटी रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.
- पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून **देहरजी मध्यम प्रकल्प** राबविण्यात येणार असून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची कामे कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणार असून रु.१,४४३.७२ कोटी निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

- सातारा जिल्ह्यातील **पाटण तालुका** विधानसभा क्षेत्रातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या **गावांचे पुनर्वसन** करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे.
- मौजे दहिसर येथील न.भु.क्र. १५६१ ते १५६७ या जागेचा वापर **मेट्रो भवन** आणि इतर मेट्रो संलग्न काम करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.
- मुंबई – अहमदाबाद जलदगती रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी वांद्रे – कुर्ला संकुलातील प्राधिकरणाची जमीन **नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. (एन.एच.एस.आर.सी.एल.)** यांना केलेल्या हस्तांतरणास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली आहे.
- अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव – बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका यांच्या **संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प** प्राधिकरणामार्फत राबविण्यास व या प्रकल्पास प्राधिकरणामार्फत व्यवहार्यता तफावत निधी (VGF) उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
- **सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा** प्रकल्पांतर्गत वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्य वितरण जलवाहिनीच्या महानगरपालिकेच्या अस्तित्वातील जलवाहिनीपर्यंतच्या कामासाठी येणाऱ्या खर्चास सुमारे रू. ३५ कोटीचा निधी व उर्वरित रक्कम रू. ५३.९५ कोटी ही दीर्घ मुदतीच्या ( १० वर्षासाठी ) कर्ज स्वरुपात देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.
- ठाणे शहरातील येऊर डोंगररांगांच्या पायथ्याशी रस्त्याच्या कामास व त्यास अपेक्षित रु.४८१/- कोटी इतक्या अंदाजपत्रकीय रकमेचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आला आहे.
- अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील रेल्वेस्थानक परिसरातील वाहनतळ व आरक्षित जागेची सर्वसाधारण वाहतूक व्यवस्था विकसित करण्याकरीता **(SATIS)** मूळ प्रशासकीय मान्यता रु. ५० कोटी एवढी असून सदर जागेवरील **बहुमजली वाहनतळ व्यवस्था** निर्माण करण्याच्या दृष्टीने होणाऱ्या वाढीव खर्चासह एकूण रु. ८१.५३ कोटी इतक्या सुधारीत रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

“मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगिण विकासासाठी एमएमआरडीए नेहमीच कार्यरत असते. नागरिकांच्या हितासाठी घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे मुंबई महानगराच्या विकासाला अजून गती मिळेल, असे मा. मुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे म्हणाले”**(समाप्त).**

**मुंबई, ठाणे व नवी मुंबई विकास करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणारे प्रस्तावित प्रकल्प :-**

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | अ.क्र. | प्रकल्पाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मेट्रो मार्ग १० | ११. | शिळफाटा ते माणकोली |
| २. | कोपरी पटणी पूल | १२. | कल्याण ते माणकोली (बापगांव) |
| ३. | तीन हात नाक्याचे रिमोडेलिंग | १३. | कल्याण —NRC-टिटवाळा |
| ४. | गायमुख ते ठाणे आणि भिवंडी जोडणारे पूल | १४. | टिटवाळा ते पडघा |
| ५. | ऐरोली बोगदा ते कटाई नाका रोड | १५. | महापे-दहिसर बोगदा |
| ६. | पालघरमध्ये रस्ता रूंदीकरण | १६. | दहिसर ते मुरबाड रोड |
| ७. | चिंचोटी ते अंजूर फाटा रस्ता | १७. | टिटवाळा ते बदलापूर |
| ८. | वाडा-वाशिंद-पडघा | १८. | तळोजा एमआयडीसी |
| ९. | मुरबे-पालघर कनेक्टिव्हिटी | १९. | खारेगाव-पडघा रस्ता सुधारणा |
| १०. | ईस्टर्न-फ्री-वे चा विस्तार (घाटकोपर ते ठाणे) | २०. | शिळफाटा ते पत्रीपूल रस्ता मध्यम उंचीचे अपग्रेडेशन |

